# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०– २५६२११५६
२५६२११५७
२५६२११५८
२५६२११६३

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
गणेशखिंड, पुणे–४११ ००७
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ–मेल – approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/3247

दिनांक : 09/10/2023

प्रति,

१. मा. अध्यक्ष/सचिव

२. मा. प्राचार्य/संचालक

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

विषय – परिसंस्था/महाविद्यालयात कार्यरत अध्यापकांचे प्रोफाईल अद्ययावत करणे व सेवामुक्त अध्यापकांचे नाव संबंधित परिसंस्था/महाविद्यालयामधून कमी करण्याबाबत...

संदर्भ – १. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२८/२०१८, जावक क्र. सीसीओ/२८७२, दिनांक १४ डिसेंबर,२०१८
२. या कार्यालयाचे पत्र क्र. सीसीओ/५८, दिनांक ९ जानेवारी, २०२०

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापकांना शिक्षक मान्यता मिळवण्यासाठी संबंधित अध्यापकांना त्यांची माहिती टिचर्स प्रोफाईलमध्ये भरणे आवश्यक असते अन्यथा त्या आध्यापकांना शिक्षक मान्यता देण्यामध्ये तांत्रिक अडथळे निर्माण होतात.

या कार्यालयाच्या असे निर्दशनास आले की, अद्यापही बरीच महाविद्यालये व परिसंस्थांनी त्यांच्याकडे कार्यरत अध्यापकांचे टिचर्स प्रोफाईल अद्ययावत केलेले नाहीत. तसेच सेवामुक्त करण्यात आलेल्या किंवा फक्त शैक्षणिक वर्षाकरिता कार्यरत असलेल्या अध्यापकांचे नाव संबंधित परिसंस्था/महाविद्यालयांमधून संबंधित शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर किंवा नंतरही संबंधित अध्यापक सेवेत नसतानाही त्या परिसंस्था/ महाविद्यालयाच्या टिचर्स प्रोफाईलमध्ये दिसून येत आहेत.

प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या परिसंस्था/महाविद्यालयात कार्यरत अध्यापकांचे प्रोफाईल त्वरित अद्ययावत करावेत, सेवामुक्त करण्यात आलेल्या किंवा फक्त शैक्षणिक वर्षाकरिता कार्यरत असलेल्या अध्यापकांचे नाव संबंधित परिसंस्था/महाविद्यालयामधून ते शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतरही टिचर्स प्रोफाईल कमी न केल्यास संबंधित संस्था/महाविद्यालयाविरूध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला

9/10/2023

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव